

# व्यथा

सी. कृ. कुडव



दि. ११।५।२००५

**॥ श्री परेशाय नमः ॥**

## व्यथा

उपस्थित पूज्य गुरुजन, राजकीय धुरीण, आणि माझ्या अच्युत गोत्रीय माताबंधूनो.

आज मी आपणा समोर काही विचार ठेवू इच्छितो. मी आज ज्या प्रवाहातून प्रवास करीत आहे. तो प्रवाह फार खडतर आहे.

**हृदयात अनेक अपूर्ण इच्छा – त्या सांगायच्या तरी कशा कुणाला ।**
**पण हे सारं दुर्दैव संकट – ऐकणार तरी कोण कशाला ॥**

**ज्याच्याकडे मित्र म्हणून आशेने पहावं – तर तो आपला**
**खरा मित्रच नसतो ।**
**स्वस्वार्थासाठी जवळीक साधणारा – पक्का दगाबाज असतो ॥**

हा आहे आज पर्यंतचा अनुभव

संत कबीर म्हणतात,

**ऐसा कोई ना मिला – जाको कहुँ दु:ख होय ।**
**जाको कहीये भेद तो – सो फिर बैरी होय ॥**

ते म्हणतात, असा कुणी आजपर्यंत मला मिळाला नाही ज्याला मी माझं दु:ख सांगेन, ज्याच्या विषयी मला आपुलकी वाटली, हा माझं दु:ख हलकं करील, माझी समस्या दूर करील अशाला मी माझ्या समस्यांचं (दु:खांचं) कारण (भेद) सांगितलं तर त्या कारणाचं भांडवल करून माझ्याशीच कपटकाव्याने (ब्लॅकमेलींग) वागू लागतो. त्याच्या कपटकाव्याच्या जाळ्यात न फसल्यामुळे मग तो माझा वैरी होतो. माझ्या वाईटावर उठतो, अपप्रचार

करतो, असे हीन अपप्रचार कानांवर आल्याने काही काळ अंतःकरणाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात. फार दुःख होतं. पण ईश्वराने दिलेल्या ज्ञानबलाने स्वतःच स्वतःला सावरून घेतो. आणि नवीन विटी-नवीन दांडू घेऊन पुन्हा निष्काम कर्म करण्यास मोकळा होतो.

## दुसरी व्यथा ऐका

**दारा शूरा बहु मिले – घायल मिला ना कोय।**
**घायलकों घायल मिले – श्यामभक्ती दृढ होय॥**

संत कबीर म्हणतात दारा-शूरा बहु मिले, दारा म्हणजे स्त्री, शूरा म्हणजे शूरवीर पूरुष. ते म्हणतात सुंदर रुपावर बाह्य साज चढवून अति सुंदर दिसण्यातच धन्यता मानून स्वतःला सुखी समजणाऱ्या स्त्रीया जगात फार पाहिल्या. तसेच शौर्य , धनदौलत, किर्ति, सत्ता यांत धन्यता मानून स्वतःला सुखी समजणारे शूरवीर जगात फार पाहिले. परंतु दृष्टपर क्षणिक उपभोगाच्या मुशीतून कोणते नरक प्रसवणार आहेत याची जाणीव असणारे घायाळ सहसा पहाण्यात येत नाहीत. जर अशा घायाळांची भेट तर झाली पुढे काय म्हणतात ते पहा–

घायल को घायल मिले तो श्यामभक्ती दृढ होय. म्हणजे दृष्टपर नाशीवंत, नरक भोगवणाऱ्या दुःखदाई प्रपंचाची जाणीव होऊन घायाळ झालेल्या समोर त्याच्याच गोत्रातला घायाळ भेटला तर शामभक्ति दृढ होईल, श्री चक्रधरांची भक्ति दृढ होईल.

बंधूनो, १९८२ मध्ये उपदेश घेतल्यापासून आज मितीपर्यंत मी मला तन, मन, धन, बुद्धि, समय अशा पंचप्रकारे ज्ञानोक्त परमार्गाच्या सेवेत झोकून दिलं, जेव्हापासून दुःखदाई प्रपंच रहाटगाडग्याच्या जाणीवेने घायाळ झालो, तो तेव्हापासून माझ्यासारख्या समदुःखी घायाळाच्या शोधात आज इथपर्यंत आलो. परंतु आजपर्यंत घायाळ कुणी सापडला नाही. हे अनुभवसिद्ध सांगतो. जेथें तेथे माझ्यापासून 'जड' पदार्थाची अपेक्षा ठेवणारे

फार सापडले. परंतु माझ्या चेतन बुद्धितून निघणाऱ्या, श्रवणाऱ्या विचारांची कुणी दखल घेत नाही.

पुढे कबीर म्हणतात-

**कबीरा गर्व ना कीजिये - कबहुन हसीये कोय।**
**अजइ नाव समुद्रमें - कब जाने का होय॥**

ते म्हणतात, ज्याच्यापाशी अमोल ठेवा आहे, त्याने कधी गर्व करु नये. समोरचा कमजोर असेल तर त्याला हसू नये. मग दाखला देतात अजइ नाव समुद्रमें कब जाने का होय। म्हणजे खोल समुद्र पर्यटन करून जग जिंकून आलेली नाव(बोट) समुद्र किनारी नांगर टाकून उभी असता केव्हा काय होईल म्हणजे मोठ्या वादळाचा तडाखा बसून तिला जलसमाधी देऊन जाईल हे भविष्यमात्र कुणी सांगू शकत नाही.

बंधूनो, ही कबीरांची उदाहरणं देण्यामागचा हेतू म्हणजे ईश्वराने साडेसातशे आठशे वर्षापूर्वी स्थापित केलेल्या सत्यसनातन धर्माची (महानुभावपंथ, जयकिशनीपंथ) परवड झालेली आहे. धर्म ग्लानिग्रस्त होण्याच्या उंबरठ्यावर घटिका मोजीत आहे. हे मी स्वानुभावाने कथन करीत आहे.

आमचाच धर्म श्रेष्ठ, आमचंच शास्त्र श्रेष्ठ इतरांचे ते हीन, कनिष्ठ. आमचा मार्ग परमेश्वराचा, इतरांचा देवीदेवतांचा म्हणून आपणाला श्रेष्ठ समजून इतरांना कनिष्ठ संबोधलं म्हणून आपण त्यांच्यापर्यंत पोहचलो नाही. स्वामी सांगतात, **'बाई' अवर धर्मापासौनि काढीः पर धर्मी लावी, हे काई साने?** ह्या वचनांचा सर्वांना जणू विसरच पडला. स्वामी म्हणतात, **'अयोग्याते योग्य करिती योग्यास परमेश्वर ज्ञान देती'**, स्वामी वचनाचा अर्थ काय सांगतो ? आणि आपण पोथीतून अर्थ काय वाखाणतो आणि ऐकणारे ऐकतो. त्यातून योग्य घेतो की अयोग्य?

बंधूनो, आपला ईश्वरीय आचार धर्मच सृष्टीत श्रेष्ठ आहे. यात तीळमात्र

शंका नाही. परंतू जगाच्या कल्याणाचा परमेश्वर मार्ग आज साडेसातशे-आठशे वर्षांत सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचला नाही . येवढी वर्षेपर्यंत आमचाच मार्ग श्रेष्ठ, आमचाच मार्ग श्रेष्ठ म्हणून आम्ही आमच्याच गुहेत कोकलतो! आणि गर्वाने म्हणतो आमचाच परमेश्वरप्राप्तीचा मोक्षमार्ग आहे. इतरांचा तो देवता फळांचा, पतित होणारा! असं म्हणून आम्ही आमची छाती फुगवतो.

स्वामी सांगतात, चतुर्वणामध्ये भिक्षाभोजन करा, माणसांमाणसातील जातीपातीचा भेदभाव मानू नका! हिंसायुक्त कर्मकाडांचा त्याग करा, स्त्री-पुरुष अधिकाराविषयी भेदभाव करू नका, सप्त व्यसनांचा त्याग करा! ज्यांना दुःखदाई, नाशीवंत प्रपंचाच्या दुःखातून मुक्त होऊन आत्यंतिक मोक्ष प्राप्त करुन घ्यायचा असेल त्याने अनन्यगती मला (ईश्वराला) शरण या. अशा अनेक आणि अनेक वचनांतून स्वामींनी जगाच्या कल्याणाचा संदेश दिला. परंतू तो संदेश 'तोतयांनी' दडपून टाकला.

**'हे शास्त्र कवणाप्रती न बोलावे'** या एका वचनाचे भांडवल उभे करुन सर्व जीवांना सुदृढ, योग्यताकारक ज्ञान देऊन उत्तराई होण्याच्या ईश्वरीय हेतूला खीळ घातली.

तोच धर्म जर तेव्हापासून आजपर्यंत समाजाला समजला असता तर लोकांनी हिंसक धर्मात प्रवेश केला नसता आणि महाराष्ट्रासारख्या सात्विकभूमीत हिंसाचाराने थैमान घातले नसतं.

बंधूनो, दुःखाची गोष्ट म्हणजे ईश्वर मार्गाचा मुख्याध्यापक म्हणविणाऱ्यांनी आपल्या बुद्धी कौशल्याचा कस लावून बुद्धीला ताण देऊन, वेळ खर्ची घालून, ईश्वराने निरुपिलेलं गुह्य ठेवणारं शास्त्र कोणतं? आणि जन समाजास हिंसामुक्त कर्मकांडमुक्त सुदृढ जीवन जगविण्यास शिकविणारं शास्त्र कोणतं? याचा योग्य निवाडा न करता ईश्वराच्या सर्वच वचनांवर हे शास्त्र कवणाप्रति न बोलावे या स्वामी वचनाची टिमकी वाजवीत काळाकुट्ट

पडदा घालून ठेवला याला काय म्हणावं?

स्वामी सांगतात, **'महात्म्यांनी चतुर्विधा भूतग्रामा अभय देयावे की.'** तसेच **'मसनीचे लाकुड तेहीवरी एका उपयोगा जाय परि आपण कव्हणाच्या उपयोगा न वचावे.'**

वरील दोन्ही वचने विरुद्ध अर्थबोधाची निरुपिली आहेत. ती स्वामी आणि समोर उपस्थित झालेल्या प्रसंगावरुन भक्तांना आणि दर्शनीयांना निरोपिली आहेत. दोन्ही प्रसंग वेगवेगळे आहेत. दोन्हीही आचरणीय आहेत. परंतु ते कोण्याप्रसंगी कोणी आचरावे जेणे करुन जनसमाज आपल्यापासून दूर जाता कामा नये, याचे भान कुणी ठेवायचे?

आपण कव्हणाच्या उपयोगा न वचावे हे मात्र कटाक्षाने साधकाच्या बुद्धीत फिट्ट बसवलं जातं आणि तसा प्रसंग आला तर महात्म्यांनी चतुर्विधा भूतग्रामा अभय देण्याचं वचन विसरलं जातं. अशा आचरणांनी इतरे जनांपासून आपला अच्युत गोत्रीय समाज दूर फेकला गेला याची आज पर्यंत कुणालाच जाणीव होत नाही. तशी कुणाला खंतही वाटत नाही.

बंधूनो, फाऽऽर फाऽऽर लिहावसं वाटतं, बोलावसं वाटतं. पण आज मला समजून कोण घेतं ? ज्याला मी ज्याची चूक दाखवतो, तोच माझ्यावर फिरतो आणि समाजात माझ्याविषयी कुटाळक्या करीत सुटतो.

आज अच्युतगोत्रीय सर्व महानुभवांनी लक्षात घेण्यासारखी आणि विचारमंथन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. नाहीतर पुढे पस्ताव्याशिवाय कोणताच पर्याय नसणार.

जवळजवळ आठशे वर्षांपूर्वी स्वामींनी चतुरवर्णांच्या भिंती पाडून सर्व मानवजात एक करा म्हणून सांगितलं. तेव्हा पासून जर ईश्वराच्या संदेशाचे पालन केलं असतं तर भारत भूमीतील बराचसा समाज दया, क्षमा, शांतीचा धर्म सोडून हिंसात्मक धर्मात सामील झाला नसता! आमच्या धर्मातील

उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्याच्या भिंतींनी मानवजात विखुरली गेली. उच्चवर्णियांनी इतरेजनांची हीन, शुद्र म्हणून कुचेष्ठा केली त्या कारणे बहुजन समाज आपला धर्म परिवर्तित करून हिंसक धर्मात सामील झाला आणि आज ही सामील होत आहे.

आज आपल्या अनेक स्थानांवर परधर्मियांनी अतिक्रमण केले आहे. गंगापूरच्या पवित्रस्थानाचा स्मशानघाट करुन सोडलेला आहे. नांदेडच्या गोरक्षण स्थानांवर जावू देत नाहीत. अनेक वासनिक, महात्मांना मारून पिटाळून लावतात. रूद्धपूरचा खरा **'राजमठ'** आपल्याबाजूने कोर्टाचा निकाल लागला असताना ते स्थान ताब्यात घेण्यास कोणी धजत नाही (मग पंचवीस-तीस वर्षांनी काय कराल?) कारण आम्हां अच्युत गोत्रियांमध्ये एकोपा नाही! कबीराच्या दोहातल्या **'शूरा'** सारखे जो तो आपापल्या दृष्टपर कोषांत सुखीया होऊन आहे! तेच जर सर्व सात्विक चवताळून उठतील, सर्व अच्युत गोत्रीय समाजाला एकवटून सरकार दरबारी कैफियत मांडली असती तर स्थानाविषयीचे अतिक्रमण थांबविता आले असते.

बंधूनो, आज जर आपली अशी दयनीय स्थिती! तर पुढे पंचवीस तीस वर्षांनी काय होईल याची कल्पना कुणी केली असेल काय? आज आपण जे गुह्यज्ञान म्हणून आमच्याच कोषांत आम्ही **'भ्रांत'** होऊन पडलो आहोत. याचे परिणाम पंचवीस तीस वर्षानंतर असणाऱ्या पिढीला भोगावे लागणार आहेत. त्यावेळी महाराष्ट्र, भारत ही परमेश्वराची सात्विकभूमी रक्तरंजित होणार आहे. आज आपण जी स्थाने पवित्र, नमस्करणीय म्हणून जतन करीत आहोत, मंदिर बांधून जीर्णोद्धार करीत आहोत ती भूईसपाट होऊन तेथे स्मशान घाट होतील. धर्मांतर करा! नाहीतर मरणाला तयार व्हा! अशी जेव्हा पाळी येईल तेव्हा आज जे पंथीय अधिकरण, साधक ते काय करणार? **'हिंसा वर्ते तीये स्थानी महात्मेनी असू नये'** हे वचन आळवीत कोणत्या सात्विक भूमीवर पलायन करणार?

मी अनेक महात्म्यांना या गोष्टी अडून अडून सांगण्याचा प्रयत्न केला. दोन वर्षांपूर्वी मातुल ग्रामच्या मंदिर उद्घाटनप्रसंगी माझ्या मनोगतातून हा विषय संक्षिप्तपणे मांडला, त्याची कुणी दखलच घेतली नाही. उलट योग्य जाणीवपूर्वक अर्थ न लावता काही बनचुके महात्मे मलाच दोष देऊ लागले. कुडव आम्हांला शिकवतो म्हणजे काय? आम्हाला काही कळत नाही काय? **आम्ही एवढी वर्षे शस्त्र काढायला किती तरी पटकरं फाडली याने कोणत्या अधिकरणाकडे अभ्यास केला?** याने किती पटकरं फाडली? आज आठशे वर्षांपासून चालत आलेली परंपरा, रुढी आमच्या पूर्वजांनी सांभाळली ती हा मोडणारा कोण ? याची नित्याची चाल आहे असे अनेक आणि अनेक प्रकारचे अपप्रचार आणि दुषणे लावून माझं अंतःकरण रक्तबंबाळ केलं आणि आजही तसाच प्रकार चालू आहे.

तात्पर्य आजही वेळ एवढीशी हाताबाहेर गेलेली नाही. भारतातील सर्व अच्युत गोत्रीय, महानुभाव, जयकीशनी आणि विखुरलेल्या सर्व अधिकरणांनी एकत्रीत यावे आणि कलीयुगींचा ईश्वर अवतार कोण? त्या अवताराने निरुपण केलेले गुह्यांत गुह्य शास्त्र नको! पण जे समाज प्रबोधनाचे जिवाच्या योग्यताकारक ठरणारे 'संदेश' सर्व जगासमोर, धर्मासमोर मांडा आणि माणसाने माणसाशी, माणसाने भूतग्रामाशी कसे वागले पाहिजे याची जाणीव करुन घ्या! ही नम्र विनंती.

अंतःकरणातल्या जाळाने काही कठोर शब्दप्रयोग झाला असेल तर अधिकरण, ज्ञानीयांची अंतःकरणे दुखावली असतील तर मी क्षमा मागतो मज पामराला क्षमा करून माझा कुप्रसव मोडावा ही नम्र विनंती.

**सुंदर विचार – आणि शुद्ध आचाराची जोपासना**<br>**हीच खरी – ईश्वरप्राप्तीची उपासना.**

जय श्री चक्रधर

आ.प.से.**सी.कृ.कुडव**